RNI No. MAHBIL /2009/35827

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष ९, अंक १] गुरुवार ते बुधवार, जानेवारी ५-११, २०२३/पौष १५-२१, शके १९४४ [पृष्ठे १३, किंमत : रुपये १५.००

### प्राधिकृत प्रकाशन

#### संकीर्ण सूचना व जाहिराती

### बृहन्मुंबई महानगरपालिका

#### जाहीर सूचना

क्रमांक DYCHE/469/MC(B.P.) CITY, दिनांक ६ डिसेंबर २०२२

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ ( आजतागायत सुधारित) च्या कलम २९७ (१) (ब) अन्वये खालीलप्रमाणे जाहिर सूचना देण्यात येत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/ दक्षिण विभागातील काकासाहेब गाडगीळ मार्ग आणि सयानी रोडमध्ये स्थित असलेल्या 'साईभक्ती मार्ग' या रस्त्याला प्रस्तावित ९.१५ मीटर (३० फूट) रुंदीकरणाबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या सभेमध्ये मंजुरीकरिता, सदर सूचना प्रस्तावित केल्यापासून ३० दिवसांच्या नंतर किंवा जेव्हा केव्हा सदरहू प्रस्ताव निकालात काढता येईल अशा महापालिकेच्या सभेत मांडण्यात येईल.

जी/ दक्षिण विभागातील ६.१० मी. (२० फूट) रुंदीच्या नगररचना (टी. पी.) रस्त्याने बाधित असलेला 'साईभक्ती मार्ग' या रस्त्याला ९.१५ मी. ( ३० फूट) करण्याचे प्रस्तावित आहे. विकास नियंत्रण आणि प्रोत्साहक नियमावली, २०३४ नियम क्रमांक १९(३) टीप (१) च्या अनुषंगाने आणि महानगरपालिका आयुक्त यांच्या क्रमांक प्र.अभि./ वि.नि./७३/साधारण / २०१९-२० च्या आदेशान्वये ९.०० मी. पेक्षा कमी रुंदीच्या रस्त्याचे स्थळाच्या सद्यःस्थितीनुसार एमआरटीपी किंवा एमएमसी कायद्यान्वये ९.०० मी. अथवा त्यापेक्षा अधिक रुंदीकरण करण्याचे निर्देशित केले आहे.

मा. महानगरपालिका आयुक्त यांची मंजुरी क्रमांक एमसीपी / १२८३ दि. १७.११.२०२२ अन्वये तत्वतः मंजूर केलेली ९.१५ मी. (३० फूट) रस्ता रेषा नकाशावर दर्शविली आहे, ज्यामध्ये प्रचलित ६.१० मी. (२० फूट) मंजूर रेषा लाल रंगात दर्शविली आहे आणि प्रस्तावित ९.१५ मी. (३० फूट) रस्ता रेषा हिरव्या रंगात दर्शविलेली असून सदर नकाशा सहायक आयुक्त जी / दक्षिण विभाग म्युनिसिपल कार्यालय, धनमील नाका, ना. म. जोशी मार्ग, मुंबई ४०० ०१३ व सहायक अभियंता (सर्वेक्षण) शहर, उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव शहर), नवीन महापालिका इमारत, भगवान वाल्मिकी चौक, विद्यालंकार मार्ग, हनुमान मंदिरा समोर, अँटॉप हिल, वडाळा (पूर्व), मुंबई ४०० ०३७ येथील कार्यालयात कार्यालयीन वेळेत निरीक्षणासाठी उपलब्ध ठेवण्यात आला आहे.

ज्या कोणास उपरोक्त प्रस्तावाबाबत प्रतिवेदने / हरकती पाठवायच्या असतील त्यांनी त्या, उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) शहर यांचे कार्यालय नवीन महापालिका इमारत, भगवान वाल्मीकि चौक, विद्यालंकार मार्ग, हनुमान मंदिरा समोर, अँटॉप हिल, वडाळा (पूर्व), मुंबई ४०० ०३७ किंवा सहायक आयुक्त जी/ दक्षिण विभाग म्युनिसिपल कार्यालय, धनमील नाका, ना. म. जोशी मार्ग, मुंबई ४०००१३ यांच्या कार्यालयात, संबंधित नोटीस प्रकाशनाच्या दिवसापासून ३० दिवसांच्या आत (सुट्टीचे दिवस धरून) प्राप्त होतील अशा प्रकारे पाठवाव्यात. त्यानंतर प्राप्त झालेली प्रतिवेदने / हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

मुंबई, दिनांक २९ डिसेंबर २०२२.
PRO: 2408 /ADV/2022-23.

**अविनाश तांबेवाघ,**
उप प्रमुख अभियंता,
(इमारत प्रस्ताव) शहर.

**BRIHAN MUMBAI MUNICIPAL CORPORATION**

**Public Notice**

No. DYCHE/469/MC(B.P) CITY, dated 6th December 2022.

Notice is hereby given pursuant to section 297(*1*) (b) of Mumbai Municipal Corporation Act, 1888 (as mentioned up to date) that, the undersigned proposes to apply to the Municipal Corporation at their meeting to be held after 30 days from display of this public notices or such day thereafter, as the said application can conveniently be disposed off for authority to accept proposed 9.15 m. (30’-0”) wide Regular line to Saibhakti Marg (Marked in A to B) located between Kakasaheb Gadgil Marg and Sayani road at TPS IV, Mahim Division in G/South Ward, Mumbai.

The Saibhakti Marg is 6.10 m. (20’-0”) wide T.P. Road and same is proposed to be widened to 9.15 m. (30’-0”) under section 297(1)(b) of MMC Act (as mentioned upto date), as per Note-1 of Regulation 19(3) of DCPR 2034 and as per subsequent order of Hon’ble Municipal Commissioner U/no ChE/DP/73/Gen /2019-20 directing to widen the roads of width less than 9.00m. to 9.00m. and above as per site condition through MR&TP Act or MMC Act, 1888.

The proposed alignment of 9.15 m. wide RL is as shown on plan, which in principally approved by Hon. Municipal Commissioner *vide* approval under No. MCP/1283,dated 17.11.2022. The prevailing alignment of sanctioned RL of 6.10 m. (20’-0”) is shown in Red Colour and proposed alignment of 9.15 m. (30’-0”) RL to be prescribed is shown in Green Colour on plan displayed at the office of Asstt. Commissioner G/South ward, Dhanmill Naka, N.M.Joshi Marg, Mumbai 400 013 & Asstt. Engineer (Survey) City, Office of the Dy. Ch.E. (Building Proposal) City, Walmiki Chowk Vidyalankar College Marg, Wadala (E.), Mumbai 400 037.

Any person desirous of making any representation to the Corporation or of bringing before the Corporation any suggestion / objection in respect of the said proposal may do so by letter addressed Dy. Ch. E. (Building Proposal) City, Walmiki Chowk, Vidyalankar College Marg, Wadala (E.), Mumbai 400 037 or Asstt. Commissioner G/South ward, Dhanmill Naka, N.M.Joshi Marg, Mumbai 400 013 and deliver at the said office within one month from the publication of this notice. The letter received after such date, cannot be considered, which please be noted.

AVINASH TAMBEWAGH,
Dy. Chief Engineer,
(Building Proposal) City.

Mumbai, Dated 29th December 2022.
PRO/ 2408 /ADV/2022-23.

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगांव विभाग, जळगांव

### चौकशीची जाहिर नोटीस

जा.क्र./ACC-१/५८०३/२०२२

**किरकोळ अर्ज क्र. ४९५/२०२२**

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्र. :— **श्री सदगुरू सखाराम महाराज विठ्ठल रूख्मिणी संस्थान, अमळनेर, ता. अमळनेर, जि. जळगांव**
**नोंदणी क्रमांक : ए-४६५/जळगांव**

**श्री. रविकांत भास्करराव देशमुख — अर्जदार**

उपरोक्त विश्वस्त व्यवस्थेची सर्व हितसंबंधित लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

सहायक धर्मादाय आयुक्त-१, जळगांव विभाग, जळगांव हे वर नमूद केलेल्या किरकोळ अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, **1950 चे कलम 79AA** अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१. उपरोक्त अर्जदार यांनी दाखल केलेल्या किरकोळ अर्जात न्यासाचे रेकॉर्ड रिकन्स्ट्रक्ट करण्याबाबत अर्ज सादर केला आहे.

२. जंगम मिळकत (वर्णन) :– न्यासाचे परी १ प्रमाणे

३. स्थावर मिळकत (वर्णन) :– न्यासाचे परी १ प्रमाणे

तरी सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल, अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, जळगांव यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ६ डिसेंबर २०२२ रोजी दिली.

**अधीक्षक (न्यायशाखा),**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
जळगांव विभाग, जळगांव.

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

### चौकशीची जाहिर नोटीस

क्र.ध.उ.आ/७५१०/२०२२

| | |
|---|---|
| योजना अर्ज क्रमांक :— | ५१/२०२२ |
| कलम — | ५० अ २ |
| सार्वजनिक न्यासाचे नाव नोंदणी क्रमांक :— | (१) श्रीराम मंदिर, अमरावती, ए–४२८ (अमरावती) |
| | अर्जदार– शैलेश जनार्दन जोग. |
| | (२) कै. सौ. विमलाबाई स्मारक ट्रस्ट, अकोला. ए–१२६३ (अकोला) |
| | अर्जदार– श्री. विजय श्रीधर आळशी |

या जाहिर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उप आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे न्यायालयात वर नमूद केलेल्या अनुक्रमांक १ व २ या न्यासाचे योजना व एकत्रिकरण/विलिनीकरणासंबंधीचे अर्ज महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम ५०अ–२ अन्वये अर्जदाराने सादर केलेले आहे.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १५ डिसेंबर २०२२ रोजी दिली.

**अधीक्षक (न्यायशाखा),**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती.

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहिर सूचना

क्रमांक उपायुक्त/४९४४/पायाभूत सुविधा दिनांक २७ डिसेंबर २०२२.

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (आजतागायत सुधारित) च्या कलम २९७ (१) (ब) अन्वये खालीलप्रमाणे प्रस्ताव दिनांक .................................. रोजी महापालिकेच्या सभेमध्ये किंवा त्यानंतर जेव्हा केव्हा सदरहू प्रस्ताव निकालात काढण्यात येईल अश्या महापालिकेच्या सभेत किंवा मनपा अधिनियम, १८८८ च्या कलम ६(क) १ अनुसार प्रशासक, बृ.मुं.मनपा यापैकी जे लागू असेल त्याप्रमाणे मांडण्यात येईल.

"महानगरपालिकेच्या 'जी/उत्तर' विभागातील हरिश्चंद्र येलवे मार्ग या रस्त्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (आजतागायत सुधारित) च्या कलम २९७(१)ब अन्वये १२.२० मी. (४०'००") रूंदीची नियमित रेषा विहित करणे तसेच सदर मार्गाचा सेनापती बापट मार्गापर्यंत विस्तार करणेबाबत सोबतच्या नकाशा क्र. ई.ई.टी.पी./सिटी/आर.एल./२४९, दिनांक २८ ऑक्टोबर २०२२ मध्ये 'ए-बी-सी-डी' रस्तारेषा अशी हिरव्या रंगाच्या रेषेने दर्शविल्याप्रमाणे १२.२० मी. (४०'००") विहित करणे"

उपरोक्त प्रवतनात असलेल्या नकाशा क्र.ई.ई.टी.पी./सिटी/आर.एल./२४९, दिनांक २८ ऑक्टोबर २०२२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे १२.२० मी. रूंदीच्या नगररचना रस्ता (हरिश्चंद्र येलवे मार्ग) रुंदीकरणाकरिता हिरव्या रंगाने 'ए-बी-सी-डी' अशी रेखांकन केलेली १२.२० मी. ची प्रस्तावीत रस्ता रेषा उप प्रमुख अभियंता (वाहतूक) यांच्या अभियांत्रिकी हब इमारत, तळ मजला, डॉ. ई. मोजेस रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८ येथील कार्यालयात व सहायक आयुक्त 'जी/उत्तर' विभाग कार्यालय, पहिला मजला, खोली क्र. २०, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प.), मुंबई ४०० ०२८ येथील कार्यालयात कार्यालयीन वेळेत निरीक्षणासाठी ठेवण्यात येत आहे.

ज्या कोणास उपरोक्त नियत प्रस्तावाबाबत प्रतिवेदने/हरकती पाठवावयाच्या असतील त्यांनी त्या महानगरपालिका चिटणीसांकडे महापालिका मुख्यालयात संबंधित सभेच्या दिवसाच्या अगोदर संपूर्ण ३ (तीन) दिवसांपूर्वी प्राप्त होतील अश्याप्रकारे पाठवाव्यात कृपया त्यानंतर पाठविलेली प्रतिवेदने/हरकती विचारात घेतल्या जाणार नाही.

**उल्हास महाले,**
दिनांक ३ जानेवारी २०२३. उप-आयुक्त,
(पायाभूत सुविधा).

**BRIHAN MUMBAI MUNICIPAL CORPORATION**

**Public Notice**

No. D.M.C./4944/Infra of 27th December 2022.

Pursuant to Section 297(1) (b) of Mumbai Municipal Corporation Act, 1888, as modified up to date, the undersigned proposes to apply to the Municipal Corporation at their meeting to be held on.......................... or on such day thereafter or to the Administrator, B.M.C. under section 6C(1) of the Act as the case may be, as the said application can conveniently be disposed off for authority to the following proposal.

" To prescribe of 12.20 mt (40ft) wide R.L. for Harishchandra Yelve Marg and extension of said road upto Senapati Bapat Marg in G/North Ward under provisions of the Sec.297(1)(b) of MMC Act, 1888 (updated) as shown in Plan bearing no. E.E.T.P./CITY/R.L./249, Dated 28th October 2022."

A plan bearing no. E.E.T.P./CITY/R.L./249, Dated 28th October 2022, showing the proposed 12.20mt wide Road Line (shown in green) marked as 'A' 'B' 'C' to 'D' to be prescribed in substitution thereof aforesaid 12.20mt wide T.P.Road (Harishchandra Yelve Marg) is deposited at the office of Deputy Chief Engineer (Traffic) of Municipal Corporation and can be inspected by any desiring to do so, at any time during office hours at Engineering Hub Building, Zero floor, near Worli Naka, Dr. E. Mozes Road, Mumbai 400 018 and also at the office of Asst. Commissioner 'G/North' Ward, Room No. 20, First Floor, Harishchandra Yelve Marg, Dadar (W.), Mumbai 400 028.

Every person desirous of making any representation to the Corporation or of bringing before the Corporation any objection in respect of the said proposal may do so be letter addressed to the Municipal Secretary at the Mahapalika Head Office, and deliver at the said office not less than three clear days before the day of such meeting or 30 days upon publication of this Public Notice.

ULHAS MAHALE,
Dy. Mun. Commissioner (Infra).

Dated this 3rd Day of January, 2023.

**विशेष वसुली अधिकारी व विक्री अधिकारी**

पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांव राजा, जि. बुलडाणा

नमुना नं. १९

**स्थावर मालमत्तेचे जप्तीबाबत नोटीस**

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१, नियम १०७ (११ड)

क्रमांक वि.व.अ./क.व./१५३/२०२२.

ज्याअर्थी, अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी, पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांव राजा, जि. बुलडाणा यांनी महाराष्ट्र राज्य सह. कायदा, १९६० कलम १०१ अन्वये थकीत कर्जदार **रामेश्वर किराणा प्रो.प्रा. शंकर खंडुजी तिडके,** रा. सावता माळी नगर, **देऊळगांव राजा**, तहसील **देऊळगांव राजा**, जि. **बुलडाणा** यांचे विरुद्ध रु. **४३४५३३** व्याज रु. **१४+२%** सरचार्ज प्रो. फी. रु. **नियमाप्रमाणे** बाबत महाराष्ट्र सहकारी नियम, १९६० नियम १०१ (१)(२) अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळविले आहे आणि त्याची अंमलबाजावणी ऋणकोची खाली दर्शविलेली मालमत्ता विक्री करावयाची आहे.

त्याअर्थी, **रामेश्वर किराणा प्रो. प्रा. शंकर खंडुजी तिडके,** रा. सावता माळी नगर, **देऊळगांव राजा** तहसील **देऊळगांव राजा, जि. बुलडाणा** यांना अशी सूचना देण्यात येते की, खाली दर्शविलेली मालमत्ता वर निर्देशित केलेल्या रकमेबाबत जप्त केलेली आहे. तरी वरील वसुली प्रमाणपत्र मिळाल्यानंतर सदर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण करण्यात आले असेल किंवा ती दुसऱ्याचे स्वाधीन करण्यात आली असेल किंवा तिच्यावर कोणताही भार ठेवण्यात किंवा निर्माण करण्यात आला असेल तर त्या सर्व बाबी पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांव राजा चे बाबतीत रद्द होतील व निरर्थक ठरतील.

**मालमत्तेचे वर्णन**

| वसुली प्रमाणपत्र क्रमांक तारीख (१) | थकबाकीदाराचे नाव व गाव (२) | घर नंबर किंवा शेताचा भूमापन क्रमांक व वर्णन (३) | चतुःसीमा (४) | शेरा मालमत्तेवरील बोजा (५) |
|---|---|---|---|---|
| **१४४५/२०१८ दिनांक २० नोव्हेंबर २०१८** | **रामेश्वर किराणा प्रो. प्रा. शंकर खंडूजी तिडके** रा. सावता माळी नगर, **देऊळगांव राजा** तहसील **देऊळगांव राजा, जि. बुलडाणा.** | **मौजे दे. राजा येथील भुमापन क्र. १६/३ मधील ० हे. ४९ आर पैकी ०.०१ आर** | पुर्वेस : **चंदाबाई कुळकर्णी**<br>पश्चिमेस : **दिलीप नारायण झोरे**<br>उत्तरेस : **सरकारी रस्ता**<br>दक्षिणेस : **रिटायर्ड कंडक्टर झोरे यांची जागा** | पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांव राजा चे थकीत कर्जापोटी जप्त. |

पुन्हा असे सुचित करण्यात येते की, वरील येणे रक्कम व्याज व खर्च दिनांक **३१ डिसेंबर २०२२** पर्यंत भरणा न झाल्यास वरील स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल.

**देऊळगांव राजा,**
दिनांक २३ डिसेंबर २०२२.

**विश्वनाथ रमाकांत पांगारकर,**
विशेष वसुली अधिकारी व विक्री अधिकारी,
पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांव राजा,
जि. बुलडाणा (महाराष्ट्र).

## जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

### अधिसूचना

क्रमांक सिंजिप/साप्रवि/नोंदणी/वाप्रअ/२४०५/ २०२२.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचा व तिच्या कार्यक्षेत्रातील पंचायत समित्यांचा सन २०२१-२२ चा एकत्रित वार्षिक प्रशासन अहवाल, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम १४२ चे आधारे व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, वार्षिक प्रशासन अहवाल नियम १९६४ व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणानुसार तयार करणेत आला असून, सदर अहवाल जिल्हा परिषद सिंधुदुर्गचे प्रशासकीय आदेश क्रमांक ११४, दिनांक १४ ऑक्टोबर २०२२ ने समंत करून तो दिनांक २१ डिसेंबर २०२२ रोजी प्रसिद्ध केला आहे.

सिंधुदुर्ग,
दिनांक २८ डिसेंबर २०२२.

**प्रजित नायर, भाप्रसे,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग.

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

### अधिसूचना

क्रमांक SRA/ED/OW/५०१८७/३क (१)/कुर्ला भाग - १/एल/२०२२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ब च्या पोट कलम (३) अनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करून दिनांक ९ एप्रिल १९९८ रोजी **राजपत्रात** प्रसिद्ध केली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(क) उप-कलम (१) अनुसार " झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र " घोषित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत.

त्याअर्थी, उक्त कलम ३(क) चे उप-कलम (१) मधील अधिकाराचा वापर करून मी, खालीलप्रमाणे अनुसूचीमध्ये दर्शविलेले क्षेत्र " झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र " म्हणून याद्वारे घोषित करीत आहे. सदरचे क्षेत्र बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ चे नियमन ३३(१०) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल करण्यास पात्र आहे :—

### अनुसूची

मौजे कुर्ला भाग - १, तालुका कुर्ला

| अ. क्र. | न.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र (चौ.मी.) | झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केलेले क्षेत्र (चौ. मी.) | एकत्रित चतुःसीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | ५२५ | १८.७० | १८.७० | न.भू.क्र. | न.भू.क्र. | न.भू.क्र. | न.भू.क्र. |
| २ | ५२५/१ ते १३ | २१८.५० | २१८.५० | ५२४ | ५२४ | ५२४ | ५२४ |
| ३ | ५२६ | ९.०० | ९.०० | न.भू.क्र. | न.भू.क्र. | न.भू.क्र. | न.भू.क्र. |
| ४ | ५२६/१ ते ७ | ६४.४० | ६४.४० | ५२४ | ५२४ | रस्ता | ५२४ |
| | **एकूण** | **३१०.६०** | **३१०.६०** | | | | |

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
प्रशासकीय इमारत, प्रा. अनंत काणेकर मार्ग,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
दिनांक १२ डिसेंबर २०२२.

**सतिश लोखंडे,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण.

## SLUM REHABILITATION AUTHORITY

*NOTIFICATION*

No.SRA/ED/OW/50187/Mass Housing Development Corporation/3C(1)/Kurla/L/2022.—Whereas, the Slum Rehabilitation Authority has formed Slum Rehabilitation Scheme under the provision of section 3B (*3*) of Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 and published in *Gazette* on 9th April 1998 ;

Whereas, in view of the provision of section 3C (*1*) of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority is empowered to declare any area as "Slum Rehabilitation Area".

Therefore, in view of the said provision of section 3C (*1*) of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971. I, undersigned is hereby declare the area shown in schedule as "Slum Rehabilitation Area". Now the said area is open to submit scheme of slum rehabilitation as per regulation 33 (10) of Development Control and Promotion Regulation, 2034 of Greater Mumbai.

*Schedule*

Village Kurla Part - 1, Taluka Kurla

| Sr. No. | C.T.S.No. | Area as per Property Card (sq. mtr.) | Area declared as "Slum Rehabilitations Area" (sq. mtr.) | Consolidated Boundaries | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | East | West | North | South |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| 1 | 525 | 18.70 | 18.70 | C.T.S. No. | C.T.S. No. | C.T.S. No. | C.T.S. No. |
| 2 | 525/ 1 to 13 | 218.50 | 218.50 | 524 | 524 | 524 | 524 |
| 3 | 526 | 9.00 | 9.00 | C.T.S. No. | C.T.S. No. | Road | C.T.S. No. |
| 4 | 526/ 1 to 7 | 64.40 | 64.40 | 524 | 524 | | 524 |
| | **Total** | **310.60** | **310.60** | | | | |

**Slum Rehabilitation Authority,**
Administrative Building,
Prof. Anant Kanekar Marg,
Bandra (E.), Mumbai 400 051.
dated 12th December 2022.

SATISH LOKHANDE,
Chief Executive Officer,
Slum Rehabilitation Authority.

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

### अधिसूचना

क्रमांक झोपुप्रा/अभि. विभाग/३क(१)/मे. रॉयल डे./२०२२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ब च्या पोट कलम (३) अनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करून दिनांक ९ एप्रिल १९९८ रोजी **राजपत्रात** प्रसिद्ध केली आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(क) उप-कलम (१) अनुसार " झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र " घोषित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना आहेत.

त्याअर्थी, उक्त कलम ३(क) चे उप-कलम (१) मधील अधिकाराचा वापर करून मी, खालीलप्रमाणे अनुसूचीमध्ये दर्शविलेले क्षेत्र " झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र " म्हणून याद्वारे घोषित करीत आहे. सदरचे क्षेत्र बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ चे नियम ३३(१०) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल करण्यास पात्र आहे :—

### अनुसूची

मौजे मालाड (द.), तालुका बोरीवली

| अ. क्र. | न.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र (चौ.मी.) | झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केलेले क्षेत्र (चौ. मी.) | एकत्रित चतुःसीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | १५५ | १५२३.५ | १०२.७३ | न.भू.क्र. १५५(पै.) | न.भू.क्र. १५९(पै.), १५९/१४, १५९/१५, १५९/३४, १५९/३५ | न.भू.क्र. १५५(पै.), | न.भू.क्र. १५५(पै.), |
| २ | १४१२ | ८५.६ | ८५.६० | न.भू.क्र. १५९ | न.भू.क्र. १६०/अ/१ | न.भू.क्र. १५९ | न.भू.क्र. १५९ |
| | **एकूण** | **१६०९.१** | **१८८.३३** | | | | |

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
प्रशासकीय इमारत, प्रा. अनंत काणेकर मार्ग,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
दिनांक २७ डिसेंबर २०२२.

**सतिश लोखंडे,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण.

## SLUM REHABILITATION AUTHORITY

*NOTIFICATION*

No.SRA/Eng. Dept./3C(1)/M/s. Royal Dev./2022.—Whereas, the Slum Rehabilitation Authority has formed Slum Rehabilitation Scheme under the provision of section 3B (*3*) of Maharashtra Slum Area (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 and published in *Gazette* on 9th April 1998 ;

Whereas, in view of the provision of section 3C (*1*) of the Maharashtra Slum Area (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority is empowered to declare any area as "Slum Rehabilitation Area".

Therefore, in view of the said provision of section 3C (*1*) of the Maharashtra Slum Area (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971. I, undersigned is hereby declare the area shown in schedule as "Slum Rehabilitation Area". Now the said area is open to submit scheme of slum rehabilitation as per regulation 33 (10) of Development Control and Promotion Regulation, 2034 for Greater Mumbai.

*Schedule*

Village Malad (S.), Taluka Borivali

| Sr. No. | C.T.S.No. | Area as per Property Card (sq. mtr.) | Area declared as "Slum Rehabilitations Area" (sq. mtr.) | Consolidated Boundaries | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | East | West | South | North |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| 1 | 155 | 1523.5 | 102.73 | C.T.S. No. 155 (pt.) | C.T.S. No. 159(pt) 159/14, 159/15, 159/34, 159/35 | C.T.S. No. 155 (pt) | C.T.S. No. 155 (pt) |
| 2 | 1412 | 85.6 | 85.60 | C.T.S. No. 159 | C.T.S. No. 160/A/1 | C.T.S. No. 159 | C.T.S. No. 159 |
| | **Total** | **1609.1** | **188.33** | | | | |

**Slum Rehabilitation Authority,**
Administrative Building,
Prof. Anant Kanekar Marg,
Bandra (E.), Mumbai 400 051.
dated 27th December 2022.

SATISH LOKHANDE,
Chief Executive Officer,
Slum Rehabilitation Authority.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.